# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक
## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा प्रादेशिक घटक)

२ रा मजला, गृहनिर्माण भवन गडकरी चौक, नाशिक- ४२२००२
ई-मेल : comhadanashik@gmail.com दूरध्वनी क्र. ०२५३-२२२९२०३

Deputy Director General (HFA) यांचे दि.२०-१२-२०२४ च्या पत्रानुसार प्रधानमंत्री अवास योजना शहरी योजना दि. ३१-१२-२०२५ पर्यंत सुरू ठेवण्यासाठी आधीच मंजूर घरे-रजिस्ट्रेशन पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे, त्या अनुषंगाने निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजनाअंतर्गत (PMAY) म्हाडा नाशिक विभागाकरिता शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील (CLTC) तज्ञांची एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात केवळ ११ महिन्यांसाठी नियुक्तीकरिता दि.०७-०१-२०२५ ते दि.१५-०१-२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत म्हाडा कार्यालय, गडकरी चौक, नाशिक येथे अर्ज मागविण्यात येत आहेत. सुट्टीचे दिवस वगळून दि.११-०१-२०२५ दि.१२-०१-२०२५)

तरी सर्व इच्छुक पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक कागदपत्रांसह अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांसह म्हाडा नाशिक कार्यालयात अर्ज सादर करावा व सदर अर्जाच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांनाच ई-मेलद्वारे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद | शैक्षणिक व अनुभवविषयक अर्हता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियंता | ०१ | १. पदवी/ पदव्युत्तर (स्थापत्य अभियंता)<br>२. स्थापत्य अभियंत्यास बांधकाम Design आणि पर्यवेक्षक क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>३. न. प. अथवा म.न.पा. मध्ये बांधकाम अभियंता म्हणून काम केले असल्यास प्राधान्य.<br>४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत ३ वर्षे प्रधानमंत्री आवास योजनेत काम केलेले असल्यास प्राधान्य.<br>५. कुठल्याही शासकीय आवास योजनेत ३ वर्षे काम केलेले असल्यास प्राधान्य. | भारत सरकार, गृहनिर्माण व शहरी गरिबी निर्मूलन मंत्रालय व प्रधानमंत्री अवास योजना शहरी सर्वांसाठी घरे यांनुसार पदवीधारक-रु.५००००/- पदव्युत्तर पदवी-रु.७५०००/- |
| २ | MIS Specialist (संगणक क्षेत्रातील पदवी) | ०१ | १. Graduate or Post Graduate degree in Computer Science or Electronics or MCA/PGDCA<br>२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत ३ वर्षे प्रधानमंत्री आवास योजना कामाचा अनुभव किंवा ३ वर्षे कुठल्याही शासकीय आवास योजनेत केलेले असल्यास प्राधान्य.<br>३. MIS Specialist करिता न.पा. म.न.पा अथवा म्हाडाचा MIS कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | |

टीप. वरील अ. क्र. १ व २ पदांकरिता शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव असणारा उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदवीधारक व सर्वोच्च अनुभवधारक उमेदवार यांची शिफारस करण्यात येऊन मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
(शिवकुमार आवळकंठे)
मुख्य अधिकारी,
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक